महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

https://jeevandeepvarta.com

मुख्य संपादक - रवींद्र घोडविंदे

Rs.2/-

सोमवार ❖ १३ जानेवारी २०२५ ❖ वर्ष ६ ❖ अंक - १९९ ❖ पाने - ४ RNI NO : MAHMAR/2016/72091 Postal Reg. No. THC/256/2022-2024

## संपादकीय

# भाजप आणि ठाकरेंचे सूर जुळणार?

रविंद्र घोडविंदे



राज्यात अडीच वर्षापूर्वी शिवसेनेत उभी फूट पडल्यानंतर भाजप व ठाकरे गटात आडवा विस्तव जात नव्हता. मात्र, गेल्या काही दिवसापासूनच राज्यातील विधानसभा निवडणुकीत महायुतीने मोठ्या फरकाने विजय मिळवल्यानंतर राज्याच्या राजकारणाने कूस बदलल्याचे दिसत आहे, त्यामुळे राज्यातील राजकारण बदलण्याचे संकेत मिळत आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे कौतूक सामन्यातून झाल्यानंतर हा राजकारणातील बदल सर्वांना जाणवत आहे.

महापालिकांच्या निवडणुका दोन महिन्यांत होतील, असे सांगितले जात आहे. यासाठी काही पक्ष स्वबळाचे तर काही पक्ष युती- आघाड्यांचे गणित सांगत आहेत. ठाकरेंची शिवसेना महाविकास आघाडीपासून चार पावले दूर असल्याचे पाहायला मिळत आहे. दुसऱ्या बाजूला आदित्य ठाकरेंच्या भेटीनंतर फडणवीस यांनी दिलेल्या एका मुलाखतीत ठाकरे कधी इकडे तर कधी तिकडे यापूर्वी होते, असे सांगत राजकारणात काहीही घडू शकते, असे दिलेले संकेत हा सारा राजकीय घडामोडींचा सिलसिला पाहता महाराष्ट्राच्या राजकारणात आणखी काही नवे घडण्याचे तर हे संकेत नाहीत ना, अशा चर्चा रंगू लागल्या आहेत. खरे तर भाजप आणि शिवसेना हे पक्ष २०१९ निवडणुकीनंतर एकमेकांपासून दुरावले. यानंतर शिवसेनेत फूटही पडली. लोकसभा आणि विधानसभेला ठाकरेंची शिवसेना महाविकास आघाडीबरोबर तर शिंदेंची शिवसेना महायुतीबरोबर राहिली. लोकसभेला राज्यात महाविकास आघाडीच्या ३१ जागांच्या विजयासह महाविकास आघाडीचा वरचष्मा राहिला; तर विधानसभेला लाडकी बहीण योजनेचे गारुड महाराष्ट्राने पाहिले. महायुतीच्या एकदम २३२ जागा आल्या आणि मोठा विजय मिळाला. महाविकास आघाडी पुरती निष्प्रभ झाली. ठाकरेंच्या शिवसेनेला २०, काँग्रेस, १६ तर शरद पवारांच्या राष्ट्रवादीला १० जागांवर समाधान मानावे लागले. या बदललेल्या राजकीय परिस्थितीनंतर महाराष्ट्रात राजकीय हालचल होणे स्वाभाविक ठरले. मुख्यमंत्रिपद भाजपकडे गेले. देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाले. मुख्यमंत्रिपद न मिळाल्याने एकनाथ शिंदे काहीसे नाराज झाल्याचे पाहायला मिळतें . या साऱ्या नव्या समीकरणात पुन्हा एकदा ठाकरे फडणवीस यांच्यात जवळीक होत असल्याचे पाहायला मिळतें. त्यांच्या भेटी वाढल्या आहेत.आणि नव्या चर्चांना धुमारे फुटत आहेत . केंद्रात भाजपला स्पष्ट बहुमत नसल्याने काही मित्र पक्षांच्या मदतीवर सरकार सुरु आहे. . अशा स्थितीत ठाकरेंच्या शिवसेनेकडे असलेले ९ खासदार केंद्रात भाजपसाठी तारक ठरणारे आहेत. या एकाच मुद्द्यावर ठाकरे - भाजप सुत पुन्हा एकदा जुळून येऊ शकतात, यासाठी भेटीचा सिलसिला वाढला आहे. सामनातून भाजपा चे गोडवे गाणे जवळ येण्याची नांदी म्हटलं जातेय.महाविकास आघाडीत सध्या ऐकला चलोचा .नारा यात पुढील युती आघाडीचे भवितव्य अवलंबून आहे. विधानसभा निवडणुकीत भाजपचे उमेदवार पाडण्यासाठी झालेली खलबत. यामुळे भाजपा आपली राजकीय पकड अधिक मजबूत करण्यासाठी संघटन शक्ती मजबूत करत आहे. राज्यात महायुतीसोबत असलेल्या अजित पवारांच्या राष्ट्रवादीकडे लोकसभेचा एकमेव खासदार आहे. शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे खासदार आपल्याकडे खेचण्यासाठी अजित पवारांची रणनीती आहे. त्याला अद्याप तरी यश आलेले नाही. या पार्श्वभूमीवर नवी राजकीय समीकरणे कोणती जन्माला येतात, हे पाहणेही औत्सुक्याचे ठरणार आहे.भाजपच्या शिर्डी येथील संघटन व पक्षसदस्य वाढ याबाबत झालेली चर्चा,राज्यातील व केंद्रातील सत्तेची फळे सामान्य नागरिकांपर्यत पोहचवण्याचा निर्धार हेच सांगून जाते.

जीवनदीप वार्ता

https://x.com/@Jeevandeepvarta
https://www.facebook.com/jeevandeepnews
https://www.instagram.com/thane_jeevandeep
https://jeevandeepvarta.com

# आगामी चार महिन्यांत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका?

## शिर्डी अधिवेशनात मुख्यमंत्र्यांची घोषणा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
साईनगर, शिर्डी

भारतीय जनता पक्षाला विधानसभेच्या निवडणुकीत मिळालेल्या यशानंतर भाजपाचं शिर्डीत आज महाअधिवेशन पार पडलं. या अधिवेशनासाठी राज्यातील भाजपाचे सर्व दिग्गज नेते आणि राज्यभरातील कार्यकर्ते उपस्थित होते. तसेच केंद्रीय गृहमंत्री अमित शाह हे देखील उपस्थित होते. भाजपाचं हे अधिवेशन आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महत्वाचं मानलं जातं. या अधिवेशनातून भाजपाने आगामी महापालिकेच्या निवडणुकीचं रणशिंग फुंकलं आहे. याच अधिवेशनात बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आगामी महापालिकेच्या निवडणुकीबाबत मोठं विधान केलं आहे. 'स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीबाबतचा सर्वोच्च न्यायालयातील निर्णय झाला तर पुढील तीन-चार महिन्यांत या निवडणुका होतील', असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

यावेळी बोलताना देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, चुकीचा नरेटिव्ह सेट करण्याचा प्रयत्न केला जातोय. पण समाजातील घटकांसाठी सुरु केलेल्या घटना शेवटपर्यंत सुरु राहणार आहेत. संघटनेला सरकारसोबत समर्थन करावं लागेल, असे देखील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले आहेत. मी हात जोडून विनंती करतो की, आपली संस्कृती इतरांपेक्षा वेगळी आहे. मंत्रालयात समाजातील कामे घेवून या. विनाकारण येवू नका, असं देखील फडणवीस म्हणालेत.

देवेंद्रजींनी आधुनिक अभिमन्य असल्याचं सिद्ध केलं, चंद्रशेखर बावनकुळे विकासाची कामं करायची आहेत, २५-१५ सामान्य लोकांच्या जीवनातील दुःख दूर करण्याचं साधन आहे. भारतीय जनता पक्षाची संस्कृती आपण सर्वांनी लक्षात ठेवावं असं आवाहन फडणवीसांनी केलंय. येत्या काळात भारतीय जनता पक्षाला मिळालेला विजय जनसामान्यांच्या जीवनात परिवर्तन करण्याकरत एक पारदर्शी चालणार सरकार आणि त्यामागे हिमालयासारखी उभी असणारी संघटना अशी प्रतिमा करायची आहे. लोकसभेच्या काळात संविधानविरोधी शक्ती, अराजकता शक्तींचा प्रभाव पाहायला मिळाला. आपल्या विरोधकांना लक्षात आलं की, मोदीजींना पराभूत करता येत नाही. त्यावेळी त्यांनी अराजकता

पसरवण्याचा प्रयत्न त्यांनी केला. या निवडणुकीत आपण त्यांना पूर्ण ताकदीनं पराभूत केलंय. पण त्यांच्या कारयावा संपल्या नाहीत. अलीकडच्या काळात बांग्लादेशी घुसखोर कागदपत्रांसोबत सापडत

आहेत. वोट जिहाद सुरु झालंय, त्यामुळे आपल्याला लढाई अजून घट्ट करावी लागेल महाराष्ट्र एकसंघ राहिला पाहिजे एक है तो सैफ है, असा मंत्र मोदीजीनी दिलाय. सगळ्या समाजाला घेवून आपल्याला पुढे जायचं आहे, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले आहेत. आपल्याला महाराष्ट्रात परिवर्तन करायचं असल्याचं देवेंद्र फडणवीस म्हणालेत.



'आपल्याला विकासाची कामे करायची आहेत. भारतीय जनता पक्षाला विधानसभेत मिळालेला महाविजय जनसामान्यांच्या जिवनात परिवर्तन आणण्यासाठी आहे. तसेच एक पारदर्शी आणि प्रामाणिकतेतून चालणारं सरकार अशी प्रतिमा आपल्या सरकारची आणि त्या सरकारच्या पाठिमागे उभी असलेल्या संघटनेची राहिली पाहिजे. जर अशा दोन्ही प्रतिमा आपण तयार केल्या निश्चित आपल्याला वारंवार मोठा विजय मिळेल

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



# एसटीच्या ताफ्यात स्वमालकीच्या बसेस

## परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
ठाणे, प्रतिनिधी

**ठाणे, १२ जानेवारी :** या वर्षांमध्ये एसटीच्या ताफ्यात स्वमलकीच्या तब्बल २६४० नव्या बसेस दाखल होत असून राज्यभरातील प्रत्येक रस्त्यावर नवी लालपरी धावताना दिसेल! असे प्रतिपादन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केले ते राष्ट्रीय रस्ता सुरक्षा अभियानाचे उद्‌घाटन करताना बोलत होते.

स्वच्छतेबरोबरच सुरक्षित प्रवासाला महत्त्व देत राज्यातील एकूणच परिवहन सेवेचा चित्र बदलण्याचा मास्टर प्लॅन आपण बनवीत असून टप्प्याटप्प्याने एसटीच्या आधुनिकीकरणाला सुरुवात होईल. त्याचा पहिला लाभ एसटी कर्मचाऱ्यांना झाला पाहिजे! त्यांच्या गणवेशापासून ते विश्रामगृह आणि स्वच्छतागृहापर्यंत त्यांना मिळणाऱ्या प्रत्येक सुविधांचा दर्जा उंचावला पाहिजे ! तरच आपण प्रवाशांना चांगल्या सुविधा देऊ शकतो. असे ते म्हणाले. - बहुप्रतीक्षित एसटीच्या स्वमालकीच्या नवीन लालपरी बसेस ताफ्यामध्ये दाखल होत असून आज १७ बसेसचे लोकार्पण मंत्री सरनाईक यांच्या हस्ते संपन्न झाले. जानेवारी महिन्याच्या अखेरपर्यंत १५० लाल परी बसेस येणार असून त्या ठाणे शहर आणि ठाणे ग्रामीण भागातील आगारांना देण्यात येतील त्यानंतर दर महिन्याला ३०० एसटी बसेस दाखल होणार असून राज्यभरातील सर्व आगारांना या बसेस मिळतील अशी माहिती मंत्री सरनाईक यांनी दिली.

### १०० खाटांचे अद्यावत दवाखाना उभारणार

एसटी कर्मचारी व त्यांच्या कुटुंबीयांसाठी बोरीवली येथे शंभर खटांचा अद्यावत दवाखाना उभारण्यात येईल जेथे राज्य शासनाच्या आरोग्य विभागाच्या सर्व सुविधा एसटी कर्मचाऱ्यांना मिळतील अशी यंत्रणा निर्माण करण्यात येणार येईल. अशी घोषणा मंत्री सरनाईक यांनी यावेळी केली.

# कीर्तन महोत्सवातील तुमची भक्ती हीच माझी शक्ती - आ.किसन कथोरे





दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूर :** बदलापूर : गेली बावीस वर्ष बदलापूर शहरात सुरु असलेला राष्ट्रीय कीर्तन महोत्सव त्याला लाभणारा उदंड प्रतिसाद यामुळे मी भारावून गेलो आहे. निवडणुका येतात नी जातात मात्र माझ्या राजकीय चाळीस वर्षाच्या कार्यकाळत तुमची लाभलेली साथ हीच माझी संपत्ती आहे. या निवडणुकीत माझा पराभव करण्यासाठी सर्वच जण एकत्र आले. परंतु तुमचा जन शक्तीचा पाठिंबा आणि आध्यात्मिक क्षेत्रातील मठाधीपती गुरुवर्य अलोकनाथ महाराज, हभप बोधले महाराज यांच्यासह या धार्मिक सोहळयातील शक्ती हीच माझी भक्ती आहे. असे प्रतिपादन आमदार किसन कथोरे यांनी राष्ट्रीय कीर्तन मोहत्सव सांगता सोहळयात केले. गेल्या आठ दिवसापासून सुरु असलेल्या राष्ट्रीय किर्तन महोत्सवाची सांगता रविवारी दिडींने झाली. मांजर्ली येथील गणेश चौकातून सकाळी आठ वाजता निघालेल्या दिडीत बदलापूरातील हजारो नागीरकाकंनी पारंपारीक

### बदलापुरातील राष्ट्रीय किर्तन महोत्सवाची सांगता

पद्धतीने वेशभूषा परिधान करून या दिडीत सहभाग घेतला होता. गांधीचौक येथील मराठी शाळेच्या पटांगणावर येवून या दिंडीचा समारोप झाला.

बदलापूर येथील गांधी चौक येथील मराठी शाळेच्या संत ज्ञानेश्वर माऊली खुल्या रंगमंचावर ५ जानेवारी पासून राष्ट्रीय किर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यता आले होते .या किर्तन महोत्सवात राज्यातीली विविध किर्तनकारांची किर्तन झाली. रविवारी सकाळी विठ्ठल नामाच्या गजरात दिडंडीने सुरुवात झाल्याव मराठी शाळेवार दिंडीडचा समारेप झाल्यावर काल्याचे किर्तन झाले. यानंतर सर्वसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. स्थानिक आमदार किसन कथोरे यांनी या किर्तन महोत्सवाचे आयोजन केले होते.

# भाजप कार्यकारी अध्यक्षपदी रविंद्र चव्हाण यांची नियुक्ती

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**शिर्डी, अहमदनगर:** भारतीय जनता पक्षाच्या शिर्डीतील अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा यांनी मोठी घोषणा केली आहे. अध्यक्षपदाच्या शर्यतीत असणारे रविंद्र चव्हाण यांची तुर्तास कार्यकारी अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्यामुळे भाजप अध्यक्षपदाची नेमणूक अजून काही दिवस लांबणीवर पडलेली आहे. दुसरीकडे स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीपर्यंत बावनकुळे पदावर राहणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

रविंद्र चव्हाण हेच पुढील भाजपचे प्रदेशाध्यक्ष असतील, असे सांगितले जात होते. शिर्डीतील अधिवेशनात त्यांच्या नावाची अधिकृत घोषणा होईल, असेही बोलले जात होते. मात्र तूर्तास त्यांच्याकडे भाजपचे कार्यकारी अध्यक्ष म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे. मार्चमध्ये भाजपाध्यक्षपदाची निवड होणार असल्याचे सांगण्यात येते.

रविंद्र चव्हाण यांच्यासाठी पक्ष संघटनेत नवे पद भाजप पक्षसंघटनेत यापूर्वी कार्यकारी अध्यक्षपद असे पद अस्तित्वात नव्हते. रविंद्र चव्हाण यांना याआधी संघटनात्मक बांधणीचे काम देऊन संघटन प्रभारी केले होते. यानंतर आता कार्यकारी अध्यक्षपदाची नवीन जबाबदारी देण्यात आली आहे. येत्या काळातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पार पडेपर्यंत चंद्रशेखर बावनकुळे यांचे प्रदेशाध्यक्षपद कायम राहणार असल्याची माहिती आहे.



### कोण आहेत रविंद्र चव्हाण?

रविंद्र चव्हाण हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मर्जीतील नेते म्हणून ओळख रविंद्र चव्हाण हे मूळ कोकणातील आहेत, परंतु डोंबिवली मतदारसंघातून ते निवडून येतात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या निकटवर्तीय म्हणूनही त्यांना ओळखले जाते रविंद्र चव्हाण यांनी मंत्रिमंडळातही काम केले आहे, प्रशासनाचाही त्यांना अनुभव आहे

# सर्वसामान्यांसाठी परवडणारी घरे उभारणार

## — उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे —

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
प्रतिनिधी

**ठाणे :** सर्वसामान्य नागरिक, काम करणाऱ्या महिला, शिक्षणासाठी येणारे विद्यार्थी आणि ज्येष्ठ नागरिक अशा सर्वांसाठी संपूर्ण राज्यात परवडणारे घरी उभारण्याचा आमचा अजेंडा आहे, अशी माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रविवारी ठाण्यातील कार्यक्रमात बोलताना दिली. तसेच सरकारच्या शाळा दत्तक घेऊन तेथील शैक्षणिक दर्जा वाढविण्यासाठी प्रयत्न करा, असे आवाहनही त्यांनी उद्योगपती गौतम सिंघानिया यांना केले.

'रेमंड कंपनी आणि सुपर क्लब आयोजित 'ऑटोफेस्ट-२०२५' या ऑटो कार फेस्टिव्हलचे उदघाटन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते रविवारी झाले. यावेळी त्यांनी स्पोर्ट्स बाईक आणि रिक्षा चालवण्याचा आनंद लुटला. यावेळी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक आणि उद्योगपती गौतम सिंघानिया यांच्यासह नागरिक उपस्थित होते. या कार्यक्रमात उपमुख्यमंत्री शिंदे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. नगरविकास आणि गृहनिर्माण अशी दोन्ही खाती माझ्याकडेच आहेत. त्यामुळे घरांसंबंधी कायदा करणे आणि त्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी माझ्याकडेच आहे. सर्वसामान्य नागरिक, काम करणाऱ्या महिला, शिक्षणासाठी येणारे विद्यार्थी आणि ज्येष्ठ नागरिक अशा सर्वांना परवडणारी घरे उपलब्ध करून देणे. त्यासाठी



ठाणे, मुंबई, मुंबई महानगर आणि संपुर्ण राज्यात परवडणारी घरे उभारणे. परवडणारी भाडे तत्त्वावरील घरे उभारणे, असा आमच्या सरकारचा अजेंडा आहे, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

परदेशातील वाहनांच्या पूर्णनिर्मितीचे काम आपल्या इथे सुरू होईल आणि यामुळे नागरीकांना नोकऱ्या आणि रोजगार उपल्ब्ध होईल. त्यामुळे ठाणे खऱ्या अर्थाने बदलत आहे. तसेच मेट्रो प्रकल्पामुळे शहरातील वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होणार आहे, असेही ते म्हणाले. आमच्या सरकारने विकासाभिमुख काम केले असून विकास हाच आमच्या सरकारचा आजवर अजेंडा राहिला आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

### शैक्षणिक दर्जा वाढविण्यासाठी प्रयत्न करा

सर्वकाही पैशांनी विकत घेता येते. पण, विश्वास आणि इमानदारी पैशांनी विकत घेता येत नाही. हेच काम रेमंड समूहाने केले आहे. कापड व्यवसायात असलेल्या या समूहाने संपूर्ण देशाला एका कपड्याच्या धाग्यात विश्वासाच्या नात्याने बांधले आहे. हा समूह प्रत्येक क्षेत्रात कार्यरत आहे. शैक्षणिक क्षेत्रात हा समूह कार्यरत असून ५० हजार हून अधिक मुलांना शिक्षण देण्याच्या काम करत आहे. या समूहाने शासनाच्या शाळा दत्तक घेऊन तेथील शिक्षणाच्या दर्जा वाढवण्यासाठी प्रयत्न करायला हवेत, असे आवाहन उपमुख्यमंत्री शिंदे यांनी उद्योगपती गौतम सिंघानिया यांना केले.

## 'ऑटोफेस्ट फेस्टिव्हलला उपस्थिती

शहरातील रेमंड कंपनीच्या शताब्दी वर्षानिमित्त 'रेमंड कंपनी आणि 'सुपर क्लब' यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या 'ऑटोफेस्ट-२०२५' या ऑटो कार फेस्टिव्हलला उपस्थित राहून अनेक अँटिक दुचाकी व चारचाकी गाड्या पाहण्याचा आनंद घेतला तसेच रिव्हेको प्युअर जिटी ही बाईक चालवण्याचाही आनंद याप्रसंगी घेतला.

# आजपासून महाकुंभ पर्वारंभ



## स्नानाचे शुभ दिवस

महाकुंभ दरम्यान स्नानाचे सहा शुभ दिवस आहेत, ज्यामध्ये तीन प्रमुख शाही स्नान (शाही स्नान) आणि तीन अतिरिक्त स्नान दिवसांचा समावेश आहेः

**१३ जानेवारी २०२५: पौष पौर्णिमा,**
**१४ जानेवारी २०२५: मकर संक्रांती (पहिले शाही स्नान),**
**२९ जानेवारी २०२५: मौनी अमावस्या (दुसरा शाही स्नान),**
**३ फेब्रुवारी २०२५: बसंत पंचमी (तृतीय शाही स्नान),**
**१२ फेब्रुवारी २०२५: माघी पौर्णिमा आणि**
**२६ फेब्रुवारी २०२५: महा शिवरात्री (अंतिम स्नान).**

जगातील सर्वात मोठी धार्मिक सभा असलेल्या लाखो भाविक सहभागी होण्यासाठी सज्ज असलेल्या, महाकुंभाची सुरुवात १३ जानेवारीला संगम नाक्यावर २,००० प्रकाशित ड्रोनच्या दृश्य प्रदर्शनासह होईल, ज्यामध्ये पौराणिक समुद्र मंथन आणि उदयासारख्या प्रतिष्ठित घटनांचे चित्रण केले जाईल. अमृत कलश. असाच ड्रोन शो २६ फेब्रुवारीला कार्यक्रमाचा समारोप देखील करेल. हरिद्वार, नंतर उज्जैन, नाशिक आणि प्रयागराजमध्ये महाकुंभासह समाप्ती नदीकाठावर - महाकुंभासाठी १२ वर्षांच्या चक्रासह दर तीन वर्षांनी कुंभमेळा आयोजित केला जातो. सहा वर्षांचा अर्धकुंभ हरिद्वार आणि प्रयागराज येथे साजरा केला जातो. हिंदू कॅलेंडरमध्ये नोंदवलेल्या चंद्र, सूर्य आणि गुरूच्या हालचालींवर आधारित कार्यक्रमाच्या तारखा ठरवल्या जातात. तुम्ही देखील कुंभ स्नानाला जाणार असाल तर तुमच्या सहलीचे आधीच नियोजन करा सर्व काही सुरळीत चालेल याची खात्री करण्यासाठी आणि शेवटच्या क्षणी तणाव कमी करण्यासाठी, भाविक आणि अभ्यागतांनी वेळेपूर्वी नियोजन केले पाहिजे. एखाद्याने वेळेच्या अगोदर राहण्याची योजना आखली पाहिजे, दिवसा लवकर प्रवास केला पाहिजे आणि आवश्यक वस्तू पॅक केल्या पाहिजेत.

### हिवाळ्यातील कपडे घ्या

संगमच्या सभोवतालचा परिसर खूप थंड असू शकतो, म्हणून उबदार कपडे पॅक करा जसे की आतील थर, मोजे, स्कार्फ, हातमोजे, टोपी आणि जड कोट. शिवाय, महाकुंभ दरम्यान हवामान अचानक बदलू शकते, म्हणून छत्री आणण्याचा सल्ला दिला जातो.

### ट्रेनमध्ये प्रवास

यात्रेकरूंचा मोठा ओघ हाताळण्यासाठी, भारतीय रेल्वेने या प्रसंगी १३,००० हून अधिक गाड्यांचे वेळापत्रक तयार करून मोठ्या प्रमाणावर ऑपरेशन सुरू केले आहे . यामध्ये १०,००० नियमित सेवा, ३,००० विशेष गाड्या आणि ५६० रिंग रेल्वे गाड्यांचा समावेश आहे ज्यामुळे प्रयागराज आणि अयोध्या, वाराणसी, जौनपूर आणि चित्रकूट यांसारख्या जवळपासच्या शहरांमधील संपर्क सुधारेल.

### वर्धित सुरक्षा

महाकुंभ स्थळ आणि प्रयागराजमध्ये २,३०० सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची स्थापना लक्षणीय आहे कारण यामुळे गर्दी नियंत्रण, लोकसंख्येच्या घनतेचे विश्लेषण, घटना अहवाल आणि नियंत्रण केंद्रांद्वारे स्वच्छतेचे निरीक्षण करण्यात मदत होईल. मेळा प्रदेशात, प्रसाधनगृहे आणि १,८५० हेक्टरमध्ये ९९ तात्पुरत्या पार्किंग जागा बांधण्याची योजना आखलेली आहे.

### ओळखपत्र सोबत ठेवा

जर तुम्ही मोठ्या गर्दीत हरवले तर आधार कार्ड, मतदार कार्ड किंवा पॅन कार्ड यांसारखे ओळखपत्र हातात ठेवा. तसेच, कुटुंबातील सदस्यांसाठी फोटो आणि संपर्क ाहिती समाविष्ट करा.

### महाकुंभात २ योगांचे शुभ मिलन!

महाकुंभसाठी भारतात काही महिन्यांपासून विशेष तयारी सुरू आहे. प्रयागराजमध्ये साधू-संत आधीच जमले आहेत. सनातन धर्माचे पालन करणारे जवळपास सर्वच आखाडे येथे पोहोचले आहेत. यावेळी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी यांच्या नेतृत्वाखाली विशेष तयारी करण्यात आली आहे. ज्योतिषशास्त्रानुसार, महाकुंभ २०२५ सारख्या अद्भुत आणि पवित्र कार्यक्रमादरम्यान रवि योग आणि भद्रावास योग तयार होतील, हा एक अत्यंत शुभ आणि धार्मिकदृष्ट्या फलदायी काळ मानला जाईल.

### महाकुंभात योगाचे महत्व

हिंदू ज्योतिषशास्त्रात रवि योग हा अतिशय शुभ योग मानला जातो. या योगामध्ये केलेले धार्मिक कार्य, उपासना, जप आणि तपश्चर्या कोणत्याही अडथळयांना किंवा अशुभ प्रभावांना दूर करण्यासाठी अत्यंत फलदायी असतात. महाकुंभसारख्या कार्यक्रमात कोणतेही कार्य यशस्वी आणि परिणामकारक करण्यासाठी हा योग योग्य आहे.शुभ वेळः १३ जानेवारी २०२५ रोजी योग सकाळी ७:१५ वाजता सुरू होईल आणि १०:३८ पर्यंत चालू राहील. या काळात केलेले स्नान, दान आणि उपासना विशेष फळ देईल.

### भद्रावास योगाचे महत्त्व

ज्योतिषशास्त्रानुसार, भद्रास योगात भगवान विष्णूची पूजा करणे अत्यंत शुभ मानले जाते. विष्णु सहस्रनाम पठण, विष्णूच्या १०८ नामांचा जप किंवा या योगामध्ये केलेले विष्णू मंत्रांचे पठण केल्याने जीवनात सकारात्मक ऊर्जा, समृद्धी आणि शांती मिळते. पौष पौर्णिमेला भाद्रवास योग तयार होत असताना सकाळी स्नान करून स्वच्छ वस्त्र परिधान करावे. देवासमोर दिवा लावा आणि त्यांना पिवळी फुले, तुळशीची पाने आणि पिवळी मिठाई अर्पण करा. विष्णु सहस्त्रनाम किंवा ओम नमो भगवते वासुदेवाय मंत्राचा जप करा.

### रवि योग आणि भद्रास योग विशेष का आहे?

ज्योतिषशास्त्रानुसार, या दोन योगांच्या योगांचा काळ दुर्मिळ आहे. हा योग केवळ वैयक्तिक कल्याणासाठीच नाही तर सामूहिक प्रार्थना आणि धार्मिक कार्यक्रमांसाठीही अत्यंत शुभ ठरतो. महाकुंभमेळयात या योगामध्ये स्नान आणि दान केल्याने अनेक पटींनी पुण्य प्राप्त होते. शक्य असल्यास या योगाच्या वेळी प्रयागराजच्या संगमावर स्नान करून गरिबांना दान करावे. तुळशीच्या रोपाची पूजा करणे आणि त्याच्या मुळांना पाणी अर्पण करणे देखील विशेष फलदायी आहे.




# मोबाईल आणि गरिबी !

## मोबाईलनं संपवलं बापलेकाचं आयुष्य

दहावीत शिकणाऱ्या मुलाची मोबाईल आणि इतर शालेय साहित्याची मागणी पूर्ण झाली नाही म्हणून शेतात जाऊन मुलानं आत्महत्या केली. त्यानंतर सकाळी शेतकामासाठी शेतात गेल्यानंतर बापानं मुलाचा मृतदेह पाहिला आणि ते दुःख सहन न झाल्यानं तिथेच स्वतःचंही आयुष्य संपवलं. कुणाही संवेदनशील माणसाचं हृदय पिळटून टाकणारी घटना घडलीय नांदेडच्या बिलोली तालुक्यातील मिनकी गावात. नांदेडच्या या पैलवार कुटुंबातील बापलेकानं आत्महत्या करून जीवन संपवल्यानं मिनकी गावावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

### नेमकं काय घडलं?

शंभरच्या पटीत लोकसंख्या असलेल्या मिनकी या छोट्याशा गावातलं पैलवार हे शेतकरी कुटुंब. वडिलोपार्जित जेमतेम असणारी शेती पैलवार कुटुंबातील राजेंद्र आणि हनुमंत हे भाऊ कसत होते.

या कुटुंबातील ४६ वर्षीय राजेंद्र पैलवार यांना तीन मुलं. या तीन मुलांपैकी सर्वात धाकटा ओंकार आणि थोरला श्रीकांत हे लातूर जिल्ह्यातील उदगीर इथं आश्रमात राहून शिक्षण घेत होते. १६ वर्षांच्या ओंकारचं यंदाचं दहावीचं वर्ष होतं. तल्लख बुद्धीचा ओंकार शिक्षणात हुशार. पुढच्या महिन्यापासून त्याची बोर्डाची परीक्षा सुरू होणार होती. त्याआधी ओंकार आणि श्रीकांत गावाकडे आले होते.

वर्गात असणाऱ्या बऱ्याच मुलांकडं मोबाईल होते, चांगले कपडे घालून ही मुलं शाळेत यायची. वर्गातील मुलांप्रमाणं आपल्याकडंही मोबाईल फोन असावा, या अपेक्षेनं ओंकारनं आपल्या वडिलांकडं (राजेंद्र पैलवार) मोबाईल घेऊन द्यावा, असा हट्ट धरला. मात्र, कर्जबाजारी झालेले वडील म्हणाले, 'यंदा तू अभ्यासाकडे लक्ष दे, पुढच्या वर्षी आपण मोबाईल घेऊ.'



♦ राजेंद्र पैलवार

मात्र, वडिलांच्या आर्थिक परिस्थिती बिकट होती. तरीही ओंकारनं वडिलांकडं मोबाईल आणि शालेय साहित्य घेण्याचा हट्ट धरला. त्यानंतर मात्र वडिलांनी ओंकारला ठणकावून सांगितलं की, पैसे नसल्यानं मोबाईल घेऊ शकत नाही.

या प्रसंगानंतर ८ जानेवारी २०२५ च्या रात्री नाराज झालेला ओंकार घरातून बाहेर पडला. दुसऱ्या दिवशी म्हणजे ९ जानेवारीच्या पहाटे नेहमीप्रमाणे राजेंद्र पैलवार शेतात कामासाठी निघून गेले. तिथं पोहोचताच समोरील दृश्य पाहून त्यांच्या पायाखालची जमीनच सरकली. कारण शेतात ओंकारनं आत्महत्या केल्याचं त्यांना दिसलं.

पोटच्या पोरानं आत्महत्या केलेलेल्या आत्महत्येचं दुःख राजेंद्र पैलवार पचवू शकले नाहीत. त्यानंतर त्यांनीही त्याच ठिकाणी आपलंही जीवन संपवलं.

### 'बँकेच्या साहेबांचा वसुलीसाठी तगादा'

प्रसिध्दी माध्यामंनी राजेंद्र पैलवार यांच्या भावाशीही बातचित केली. राजेंद्र आणि त्यांचे भाऊ हनुमंत पैलवार हे एकत्रितरित्या शेती करत होते.

हनुमंत पैलवार यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितलं की, 'यावर्षी अतिवृष्टी झाल्यानं हाताशी आलेलं पीक गेलं. बँकेची नोटीस आली होती. बँकेचे साहेब घरी यायचे. शेत विका आणि कर्ज भरा, असा तगादा ते लावायचे. त्याचं टेन्शन भावाला होतं. त्यात मुलानं असा टोकाचा पाऊल उचल्यानं भावानंही जीवन संपवलं.'

याच गावातील तरुण शेतकरी प्रकाश भंडारे म्हणतात की, 'मागच्या काही वर्षांपासून या भागात अतिवृष्टी होत आहे. त्यात पैलवार यांचं शेत ओढ्याच्या जवळ आहे, त्यामुळे १२ महिने त्यांचं शेत ओलिताखाली असतं. म्हणून हाताला काही लागत नाही.

'त्यात बँकेचे आणि खासगी सावकाराचे कर्ज आणि त्याच्या नोटिसा येत होत्या. त्यामुळे ते नैराश्यात होतेच. अशा घटना थांबवायच्या असतील तर शेतकऱ्यांच्या मालाला चांगला भाव दिला पाहिजे आणि नुकसानभरपाई भरीव करायला पाहिजे.'

# पालक नव्हे सुपरफूड

**पालकाला सुपरफूड म्हटले जाते, त्याची अनेक कारणे आहेत. पालकामध्ये कॅलरीज कमी असून, मोठ्याप्रमाणात पोषण तत्वाचा साठा आहे. पालकामध्ये कॅल्शियम, मॅग्नेशियम, लोहसोबतच व्हिटॅमिन ए आणि सी आढळून येते. तुम्ही जर तुमच्या आहार नियमितपणे पालकाचा समावेश केला तुमचे कर्करोगासारख्या आजारांपासून संरक्षण होते. रक्तातील सखारेचे प्रमाण नियंत्रित राहाते. पालकाच्या नियमित सेवनाने वजन देखील कमी होते. तसेच रक्तातील हिमोग्लोबिनचे प्रमाणा वाढते. पालकाचे नियमित सेवन केल्यास मधुमेहासारखी समस्या देखील दूर होते.**

हिवाळयात सर्व प्रकारच्या हिरव्या पालेभाज्या खाव्यात असा सल्ला जवळपास सर्वच आहारतज्ज्ञ देतात. हिरव्या पालेभाज्या या विविध पोषण तत्वे आणि व्हिटॅमिनचा स्त्रोत असतात. पालेभाज्याच्या सेवनाने तुमच्या शरीराला मोठ्याप्रमाणात पोषण तत्वे मिळताच. तसेच व्हिटॅमिनची कमतरता देखील दूर होते. हिवाळयाच्या दिवसांमध्ये पालेभाज्यांचे सेवन केल्यास इम्युनिटी वाढण्यास देखील मदत होते. कोरोना काळात तर पालेभाज्याचे सेवन अत्यंत महत्त्वाचे बनले आहे. पालेभाज्यांमध्ये मेथी, चुका, शेपू, पालक अशा विविध भाज्यांचा समावेश होतो. यापैकी एक असलेल्या पालकाच्या सेवनाचे फायदे तसेच कोणत्या व्यक्तींनी पालक खाणे टाळावे याबद्दल आज आपण माहिती जाणून घेणार आहोत. पालकाला सुपरफूड असे म्हटले जाते. त्यामध्ये अनेक औषधी गुणधर्म देखील आहेत. आजारी मानसाला पालक खायला दिल्यास तो लवकर रिकव्हर होण्यास मदत होते.



सांधेदुखीचा त्रास होत असेल तर मात्र पालकाचे सेवन न करण्याचा सल्ला तज्ज्ञांकडून दिला जातो. पालकामध्ये ऑक्सॅलिक ॲसिडसह प्युरिन, देखील भरपूर असते. ही दोन संयुगे एकत्रितपणे संधिवात उत्तेजित करू शकतात. त्यामुळे सांधेदुखीचा त्रास आहे त्यांनी पालकाचे सेवन करणे टाळावे. तसेच तुम्ही जर एखाद्या आजारामुळे रक्त पातळ करण्याची औषधे घेत असाल तर पालकाचे सेवन टाळावे.

# इंजिनीअरिंगमध्येही 'कॅरी ऑन'



इंजिनीअरिंगच्या पहिल्या वर्षी लागलेली केटी तिसऱ्या वर्षापर्यंत सुटली नसेल, तरीही 'कॅरी ऑन' धोरण स्वीकारून मुंबई विद्यापीठाने तिसऱ्या वर्षासाठी प्रवेश द्यावा, या मागणीसाठी १५० विद्यार्थ्यांनी मुंबई विद्यापीठाच्या कलिना संकुलात आंदोलन सुरू केले आहे. राज्यातील अन्य विद्यापीठांनी हे धोरण स्वीकारले असताना मुंबई विद्यापीठ का नाकारत आहे, असा प्रश्न हे विद्यार्थी उपस्थित करत आहेत. याबाबतचा निर्णय विद्यापीठाच्या विद्वत परिषदेत घेतला जाईल, असे प्रशासनाने स्पष्ट केले.लॉकडाउननंतर इंजिनीअरिंगसाठी विद्यापीठाशी संलग्न विविध कॉलेजांमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांपैकी काहींना पहिल्या वर्षाला एटीकेटी लागली. म्हणजेच हे विद्यार्थी एक किंवा दोन विषयांत उत्तीर्ण होऊ शकले नाहीत. करोनानंतरच्या काळात घाईघाईत अभ्यासक्रम पूर्ण करत संपूर्ण शैक्षणिक वर्ष सहा महिन्यांत गुंडाळण्यात आले. त्यामुळे आम्हाला अनेक विषयांचे सखोल ज्ञान मिळालेच नाही. त्याचा परिणाम आमच्यापैकी अनेकांना केटी लागण्यात झाला, असे प्रियांका बरई या विद्यार्थिनीने सांगितले.प्रियांका आणि तिच्यासोबत १५० विद्यार्थ्यांनी कलिना संकुलात ठिय्या आंदोलन पुकारले आहे. याबाबत या विद्यार्थ्यांनी विद्यापीठाकडे पत्रव्यवहारही केला होता. मात्र काहीही प्रतिसाद न मिळाल्याने त्यांनी आता उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांना पत्र लिहून 'कॅरी ऑन' धोरण अवलंबण्याची मागणी केली आहे.

# काळा रंग संक्रांतीला शुभ कसा?

१४-१५ जानेवारी रोजी देशात जल्लोषात 'मकर संक्रांत' हा सण साजरा केला जातो. नवीन वर्षाची सुरुवात 'मकर संक्रांत' या सणाने होते. प्रत्येक घरात तिळगुळ दिले जातात. बाजारत पतंग देखील पाहायला मिळत आहे. या दिवशी आंघोळ, तिळ गुळ आणि दान देखील केले जाते. तसेच पतंग देखील उडवली जाते. या दिवसाचे आणखी एक गोष्ट महत्त्वाची असते ती म्हणजे काळ्या रंगाचे कपडे. या दिवशी काळ्या रंगाची पूजा केली जाते. काळा रंग परिधान करणे शुभ मानले जाते. मकर संक्रांतीला काळ्या रंगाचे कपडे का घालतात? संपूर्ण देशात मकर संक्रांत वेगवेगळ्या नावाने साजरी केली जाते. प्रत्येक धर्मात हा सण विशेष दिवस म्हणून साजरा करतात. महाराष्ट्रात या दिवशी काळ्या रंगाचे कपडे घातले जातात. कारण या दिवसांमध्ये सर्दी सुरु होते आणि पाणझडीचे दिवस देखील असतात. थंडीपासून बचाव करण्यासाठी काळ्या रंगाचे कपडे घातले जातात. काळ्या रंगाच्या कपड्यांमध्ये उष्णता निर्माण केली जाते. शरीर गरम राहण्यास मदत होते. थंडीच्या दिवसात तीळ हे शरीरास अत्यंत उपयोगी आहे. म्हणून तीळ-गूळ देण्याची प्रथा पडली. वर्षभरात कुणाशीही भांडणं झालं असेल, तर मकर संक्रांतीच्या दिवशी तिळगूळ देऊन 'तिळगुळ घ्या गोड गोड बोला' हा संदेश देण्याची प्रथा आहे. हिंदू धर्मानुसार, मकर संक्रांतीला सूर्याची पूजा केली जाते. या दिवशी सूर्य मकर राशीत प्रवेश झाल्यानं दिवस मोठा होतो आणि रात्र लहान होते. तसेच मकर संक्रांतीपासून थंडी हळूहळू कमी होते. मकर संक्रांत हे नवीन पिकाच्या आगमनाचं प्रतीक आहे. या दिवसापासून सूर्य दक्षिणायनातून उत्तरायणाकडं सरकतो. मकर संक्रांतीच्या दिवशी काळे वस्त्रे परिधान करण्याची प्रथा आहे. काळा रंग हा अशुभ नाही. सौभाग्य लेणं मंगळसूत्राच्या मण्यांचा रंगही काळाच असतो. संक्रांतीच्या दिवशी रात्र मोठी असते. या दिवसापासून दिनमान वाढायला सुरुवात होते. काळोख्या मोठ्या रात्रीला काळ्या रंगाची वस्त्रे नेसून निरोप दिला जातो. दुसरं महत्त्वाचं वैज्ञानिक कारण म्हणजे वस्त्राचा काळा रंग हा उष्णता शोषून घेतो. मकर संक्रांती ही थंडीमध्ये येत असते. थंडीच्या दिवसात शरीर उबदार रहावं म्हणून काळ्या रंगाची वस्त्रे परिधान करण्याची प्रथा आहे.



सोमवार
१३ जानेवारी २०२५

| | | | |
|---|---|---|---|
| **मेष** | **कर्क** | **तुळ** | **मकर** |
| आजचा दिवस तुमच्यासाठी अनुकूल असेल. दिवसाचा अधिक वेळ प्रवासात घालवू शकता. | कुटुंबियांसोबत वेळ घालवाल. अचानक काही मोठा आर्थिक लाभ होईल. समाधान मिळेल. | आर्थिक बाजू पूर्वीपेक्षा मजबूत होईल.आजचा दिवस चांगला जाईल. आरोग्याची काळजी घ्या. | चांगले काम करण्याचा प्रयत्न कराल. सर्वांचे पूर्ण सहकार्य मिळाल्याने समाधानी दिसाल. |
| **वृषभ** | **सिंह** | **वृश्चिक** | **कुंभ** |
| मेहनतीने केलेल्या कामात यश मिळेल. विद्यार्थ्यांना नव्या प्रकल्पावर कामाची संधी मिळेल. | जीवनात सुख मिळेल. अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेली सरकारी कामे आज पूर्ण होतील. | दिवस तुमच्यासाठी अनुकूल असेल. मुलांकडून चांगली बातमी मिळेल. उधारी-कर्ज घेऊ नका. | कुटुंबातील सर्व सदस्य होतील. शिक्षकांचे सहकार्य मिळेल. महत्त्वाकांक्षाही वाढू शकतात. |
| **मिथुन** | **कन्या** | **धनु** | **मीन** |
| आरोग्याच्या दृष्टीने निरोगी वाटेल. तुमच्या मेहनतीचे फळ तुम्हाला नक्कीच मिळेल. | आर्थिक बाबतीत लाभ होईल. भविष्य सुधारण्यासाठी तुम्ही नवीन पावले उचलाल | आज तुम्ही तुमच्या खर्चावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न कराल. शिक्षकांचे सहकार्य मिळेल. | येत्या काळात तुमच्या बोलण्याने सगळे प्रभावित होतील. लवकरच नवीन जबाबदाऱ्या मिळतील. |

# लोकांच्या मनावर राज करणारी बाईक




बजाज फ्रीडम १२५ ही दुचाकी सेगमेंटमधील एकमेव सीएनजी मोटरसायकल आहे, जी जवळजवळ ६ महिन्यांपूर्वी लॉँच झाली आहे. या बाईकच्या विक्रीत सातत्याने वाढ होताना दिसत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, कंपनीने आतापर्यंत या बाईकचे ४० हजारांहून अधिक युनिट्स सेल केले आहे. बजाज ऑटोचे कार्यकारी संचालक म्हणाले की, बजाज कॅग बाईकने चांगली सुरुवात केली आहे. ऑगस्टमध्ये लॉँच झाली तेव्ही विक्रीत किरकोळ वाढ होती. परंतू आता या बाईकला ग्राहकांकडून भरपूर प्रेम मिळत आहे. बजाज फ्रीडम बाईकमध्ये १२५ सीसीचे पॉवरफूल इंजिन आहे, जे चांगली पॉवर आणि जबरदस्त मायलेज देते. या बाईकची डिझाइन खूप attrative आहे. या बाईकमध्ये डिजिटल डिस्प्ले, एलईडी लाईट्स आणि कंफर्ट सीट्स सारखी जबरदस्त फीचर्स आहे. ही बाईक परवडणाऱ्या किमतीत लॉँच झाली असून या बाईकला इंडियन मार्केटमध्ये भरपूर डिमांड आहे. ही बाईक ६०-६५ किमी प्रति लिटर मायलेज देते. या बाईकमध्ये डिजिटल डिस्प्ले, एलईडी लाईट्स आणि कंफर्ट सीट्स यासारखी फीचर्स आहेत. पेट्रोल मोडमध्ये ही बाईक १३० किलोमीटरची रेंज देते. पेट्रोल आणि सीएनजी मोडमध्ये ही बाईक ३३० पर्यंत मायलेज देते.

# ग्रंथालयांच्या सक्षमीकरणासाठी सीएसआर निधी मिळवून देणार!

## उद्योग व मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांची ग्वाही

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
□ प्रतिनिधी

**ठाणे :** मराठीत उत्तमोत्तम पुस्तके प्रकाशित व्हावीत यासाठी प्रकाशकांना राजाश्रय मिळायला हवा. तसेच पुस्तकांच्या प्रसारासाठी ग्रंथालयांना सक्षम करण्याची गरज आहे. खासगी उद्योग-व्यवसायांकडून देण्यात येणारा सीएसआर निधी ग्रंथालयांच्या संवर्धनासाठी वापरला जायला हवा. त्यादृष्टीने आम्ही प्रयत्नशील आहोत, असे प्रतिपादन राज्याचे उद्योग व मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी केले. ज्येष्ठ लेखक व राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे उपाध्यक्ष प्रा. डॉ. प्रदीप ढवळ लिखित 'संन्यस्त ज्वालामुखी' या चरित्रकादंबरीचे प्रकाशन रविवारी मंत्री उदय सामंत यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. त्यावेळी ते बोलत होते.

### प्रा. डॉ. प्रदीप ढवळ लिखित 'संन्यस्त ज्वालामुखी' या चरित्रकादंबरीचे प्रकाशन

कोकण मराठी साहित्य परिषद, शारदा एज्युकेशन सोसायटी आणि शारदा प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी ठाण्यातील डॉ. काशीनाथ घाणेकर नाट्यगृह येथे प्रा. डॉ. प्रदीप ढवळ लिखित 'संन्यस्त ज्वालामुखी' या स्वामी विवेकानंद यांच्यावरील चरित्रकादंबरीचा प्रकाशन सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी मंत्री उदय सामंत, मंत्री प्रताप सरनाईक, राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे, विश्वकोश निर्मिती मंडळाचे अध्यक्ष डॉ. रवींद्र शोभणे, ज्येष्ठ नाटककार अशोक समेळ, लेखक-कवी प्रा. अशोक बागवे, प्रा. प्रवीण दवणे, किशोर कदम (सौमित्र), कोकण मराठी साहित्य परिषदेच्या अध्यक्ष नमिता कीर, शारदा एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष विलास ठुसे, शारदा प्रकाशनाचे प्रा. संतोष राणे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांच्या उपस्थितीत 'संन्यस्त ज्वालामुखी'चे प्रकाशन करण्यात आले. यावेळी मनोगत व्यक्त करताना मंत्री उदय सामंत म्हणाले की, 'वाचाल तर वाचाल' असे ट्रकच्या मागे लिहून बिंबवण्याची वेळ आपल्यावर आली आहे. ही परिस्थिती सुधारायची असेल तर प्रत्येक जिल्ह्यात चांगले लेखक आणि वक्ते तयार व्हायला हवेत. हिंदुत्व काय आहे हे जगाला ठासून सांगणारे स्वामी विवेकानंद यांचे विचार आजच्या पिढीला सांगायला हवेत. 'संन्यस्त ज्वालामुखी' ही कादंबरी त्यादृष्टीने राज्यातील सर्व ग्रंथालयांमध्ये पोहोचायला हवी, अशी भावना मंत्री उदय सामंत यांनी याप्रसंगी व्यक्त केली.

# कल्याणमध्ये मद्यधुंद कार चालकाचा थरार मोटारीसह दहा दुचाकींना धडक



दै.ठाणे जीवनदीप वार्ता
प्रतिनिधी

**कल्याण :** कल्याण पश्चिमेतील बाजारपेठ पोलीस ठाणे हद्दीतील चिराग हॉटेल समोरील रस्त्यावर शुक्रवारी रात्री एका मद्यधुंद मोटार कार चालकाचा वाहनावरील ताबा सुटला. या वाहन चालकाने रस्त्याच्याकडेला उभ्या असलेल्या आठ ते दहा दुचाकींना जोरदार धडक दिली. सुदैवाने या अपघातात कोणी जखमी झाले नाही. मोटारीसह दुचाकींचे वाहनाच्या धडकेत नुकसान झाले आहे. चिराग हॉटेल समोरील रस्त्यावरून एका मोटार कार चालक सुसाट वेगाने चालला होता. या मोटार कार चालकाचे तो मद्यधुंद अवस्थेत असल्याने त्याचे मोटारीवरील नियंत्रण सुटले. त्याने रस्त्याच्याकडेला उभ्या असलेल्या आठ ते दहा दुचाकींना जोराची धडक दिली. धडक झाली त्यावेळी मोठा आवाज झाल्याने या रस्त्याच्या परिसरातील पादचारी आणि दुकानदार इतस्ता पळाले. या भागातील सोसायट्यांमधील रहिवासी रस्त्यावर उतरले. या वाहनाची धडक होत असताना सुदैवाने तेथे कोणी नव्हते. अन्यथा जीवित हानी झाली असती, असे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. मोटारीच्या धडकेनंतर जागरूक पादचाऱ्यांनी एकत्रित येऊन मोटार कार चालकाला रोखून धरले. बाजारपेठ पोलिसांना तातडीने ही माहिती देण्यात आली. बाजारपेठ पोलीस ठाण्याचे हवालदार घटनास्थळी आले. मोटार चालक मद्यधुंद अवस्थेत असल्याने पोलिसांनी त्यांना वाहनातून खाली उतरवले. चालकाने पोलिसांना आपले नाव अनिल तिवारी सांगितले. पोलिसांनी त्याची तपासणी केली असता त्याने मद्य सेवन केले असल्याचे आढळले. पोलिसांनी त्याचे दृश्यध्वनीचित्रण केले.

पोलिसांनी या मोटार चालकाला पालिकेच्या रुक्मिणीबाई रुग्णालयात वैद्यकीय तपासणीसाठी नेले. त्यांनी मद्यसेवन केले असल्याचे तपासात उघड झाले. हा मोटार चालक सदरा न घालता बनियन घालून वाहन चालवत होता. वैद्यकीय तपासणीनंतर पोलिसांनी अनिल तिवारी यांना बाजारपेठ पोलीस ठाण्यात आणले. मद्यधुंद अवस्थेत तिवारी यांनी वाहन चालविल्याने नागरिक तीव्र संताप व्यक्त करत होते. पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांनी शहरात मद्यधुंद, नशेखोर, गांजा तस्कर यांच्या विरुध्द जोरदार मोहीम उघडली आहे. हे माहिती असुनही काही सुस्थितीत घरातील नागरिक मद्य सेवन करून वाहन चालवित असल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

या वाहन चालकावर मोटार वाहन कायद्याने दंडात्मक आणि फौजदारी कारवाई केली जाईल, असे बाजारपेठ पोलिसांनी सांगितले.

# अनधिकृत बांधकामांना वसई विरार मनपाचे पाणी बंद !

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**वसई :** शहरातील अनधिकृत बांधकामांना नळ जोडण्या दिला जाणार नसल्याचे पालिकेने जाहीर केले आहे. अनधिकृत बांधकामे रोखण्यासाठी सर्वोच्च न्यायालयने मार्गदर्शक तत्वे जाहीर करून भोगवटा प्रमाणपत्र असल्याशिवाय नळ, पाणी, वीज न देण्याचे आदेश दिले होते. त्या आदेशाची अंमलबजाणी करण्यासाठी पालिकेने सुरवात केली आहे.

अनधिकृत बांधकामे ही मोठी समस्या आहे. बेकायदा बांधकामामुळे रहिवाशांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. बांधकामाचा वीज, पाणी, रस्ते यासंबंधी देखील परिणाम होत असतो. त्यामुळे अनधिकृत बांधकामांना रोखण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने नुकताच महत्वपूर्ण निकाल दिला आहे. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश जे.बी. पारडीवाला आणि न्यायाधीश आर.माधवन यांच्या खंडपीठाने यासंबंधी जारी केलेली मार्गदर्शक तत्वे जाहीर केली आहे. भोगवटा प्रमाणपत्र असल्याशिवाय कुठल्याही बांधकांनाना वीज, पाणी मलनिस्सारणाची जोडणी देऊ नये असे या आदेशात म्हटले आहे. अशा बांधकांना बँक, वित्तीय संस्था कर्ज देऊ नये तसेच अनधिकृत इमारतीमध्ये कोणत्याही स्वरुपाच्या व्यवसायाला परवानगी देऊ नये असेही न्यायालयने स्पष्ट केले आहे. या निकालानंतर वसई विरार महापालिकेने आढावा बैठक घेऊन ही मार्गदर्शक तत्वे अमलात आणण्याचा निर्णय घेतला आहे. सर्व ९ प्रभाग समितीमधील सहाय्यक आयुक्त, विभाग प्रमुख यांना तशा सुचना देण्यात आल्या आहेत. अशी माहिती पालिकेचे अतिरिक्त आयुक्त रमेश मनाळे यांनी दिली.

२०१८ मध्ये वसई विरार महापालिकेने सर्व अनधिकृत बांधकांना नळजोडण्याचा देण्याचा ठराव एकमताने मंजूर केला होता. घरे अनधिकृत असली तरी त्यात राहणारे अनधिकृत नसतात असा युक्तीवाद महासभेत करण्यात आला होता. त्यानंतर अनधिकृत इमारती आणि बांधकांना नळ जोडण्यात देण्यात येत होत्या. आता सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे पालिकेचा हा ठराव रद्द करावा लागणार आहे. याबाबत कायदेशीर बाबी पडताळल्या जातील असे पालिका अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

### महावितरणाकडून वीज जोडण्या सुरूच

**२०१७ मध्ये नागपूर खंडपीठाने एका जनहित याचिकेवर निर्णय अनधिकृत बांधकामांना नविन वीज मीटर जोडण्या देता येत नसल्याचे स्पष्ट केले होते. मात्र तरी देखील महावितरण अनधिकृत बांधकांना वीज जोडण्या देत होती. आता सर्वोच्च न्यायालयानेही वीज जोडण्या न देण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे महावितरण आता तरी वीज जोडण्या थांबवेल का असा प्रश्न उपस्थित झाला आहे. सर्वोच्च न्यायालयाने मार्गदर्शक तत्वे जारी केली आहेत ही चांगली बाब आहे. आतापर्यंत उच्च न्यायायलयात अनधिकृत बांधकामासंदर्भात अनेक जनहित याचिका दाखल होत्या. त्यावर दिलेल्या आदेशांचे पालिकेने पालन केले नाही. त्यामुळे या आदेशाचे कितपत पालन होईल अशी शंका सामाजिक कार्यकर्ते आणि अनधिकृत बांधकामाविरोधात याचिका दाखल करणारे टेरेन्स हेंड्रिक्स यांनी व्यक्त केली आहे.**

# शहापूर तालुक्यातील अंगणवाड्या अंधारात?

> राज्य शासनाच्या आदेशाप्रमाणे शहापुर तालुक्यातील अंगणवाड्यांना वीज जोडणी देण्याच्या दृष्टीने आढावा घेतला जात आहे. प्रत्येक अंगणवाडीला वीज जोडणी मिळेल यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. काही अंगणवाड्यांना स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून सौर संचाच्या माध्यमातून वीज जोडणी देण्याचे प्रयत्न आहेत.
>
> - धनश्री साळुंखे, महिला व बालकल्याण अधिकारी, शहापूर.

## साडेचारशेहून अधिक अंगणवाड्यांना वीज नाही?

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** ठाणे जिल्ह्याच्या शहापूर तालुक्यातील खेडेगाव, आदिवासी दुर्गम भागात असलेल्या ५७७ अंगणवाड्यांपैकी सुमारे ४६० अंगणवाड्यांना महावितरणचा वीज पुरवठा नाही. त्यामुळे अंगणवाडी सेविकांना अनेक ठिकाणी अंधारात, वर्गात पंखात नसल्याने घामाघूम होत बालकांना शिक्षणाचे धडे द्यावे लागत आहेत. घरात पंख्याची सवय असल्याने अंगणवाडीतील लहान बालके अंगणवाडीत पंखा, काही ठिकाणी खिडक्या नसल्याने अंगणवाडीत रमत नसल्याच्या पालकांच्या तक्रारी आहेत.

या अस्वस्थतेमुळे अनेक बालके अंगणवाडीत रडारडी करतात. त्यांना सांभाळताना अंगणवाडी सेविकांची दमछाक होत आहे. शहापूर तालुक्यातील बहुतांशी अंगणवाड्या गावातील समाज मंदिर सभागृहात, गावकीचे देऊळ, काही गावातील मोठे घर असलेल्या ग्रामस्थांच्या घरात भरविल्या जातात. शासन, ग्रामपंचायत मालकीच्या जागेत स्वतंत्रपणे अंगणवाड्या चालविल्या जात आहेत. अंगणवाडीसाठी स्वतंत्र इमारत असल्याची संख्या शहापूर तालुक्यात तुरळक आहे.

बालकांना शाळेची ओढ लागावी. बालवयापासून त्यांच्यावर विविध प्रकारचे चांगले संस्कार व्हावेत. गावातील विविध प्रकारच्या बालकांना एकत्र आणून त्यांना खेळ, गाणी, मनोरंजन, मौजमजेचे धडे द्यावेत. या पीढीला नंतर शाळेत जाण्यासाठी अवघड वाटू नये. त्यांच्यात शाळेची गोडी निर्माण व्हावी, या उद्देशातू शासनाकडून गाव, शहर स्तरावर अंगणवाडी उपक्रम राबविला जातो.

महिला आणि बालविकास विभागाच्या अंतर्गत शहापूर तालुक्यात अंगणवाड्यांचे दोन विभाग आहेत. शहापूर प्रकल्पांतर्गत २८६, दुर्गम भागातील डोळखांब प्रकल्पांतर्गत २९१ अंगणवाड्या आहेत. या एकूण ५७७ पैकी सुमारे ४६० अंगणवाड्यांमध्ये महावितरणची वीज जोडणी नाही. त्यामुळे तेथे उजेडासाठी वीजेचे बल्ब, पंखा नाही. शासनाचे बहुतांशी उपक्रम अलीकडे ऑनलाईन माध्यमातून राबविले जातात. यासाठी अंगणवाडीत इंटरनेटची गरज असते. वीज जोडणी नसल्याने अंगणवाडी सेविकांना खासगी इंटरनेटचा वापर करून शासकीय कामे करावी लागतात. काही अंगणवाड्या घर मालकांनी गावातील मुलांना गावातच शिक्षण मिळावे या उद्देशातून घरातील जागा अंगणवाडी म्हणून वापरण्यास दिली आहे. याठिकाणी मालक घरातील विजेचा वापर करण्यास सेविकांना मज्जाव करतात. त्यामुळे आहे त्या परिस्थितीत अंगणवाडी सेविकांना बालकांना शिकवावे लागते.

राज्यातील अंगणवाड्यांना वीज जोडणी देण्याचे आदेश शासनाने संबंधित विभागांना दिले आहेत. या आदेशाप्रमाणे शहापूर तालुक्यातील महिला व बाल कल्याण विभागातर्फे वीज पुरवठा नसलेल्या अंगणवाड्यांची माहिती संकलित करण्याचे काम सुरू आहे, असे अधिकाऱ्याने सांगितले.

# सिडको अध्यक्षपदाचा खांदेपालट निश्चित

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी मुंबई :** विधानसभा निवडणुकीच्या आचारसंहितेपूर्वी महायुती सरकारने सिडको महामंडळाच्या अध्यक्षपदी संजय शिरसाट यांची नियुक्ती केली होती. विधानसभेच्या निवडणुकीत यश मिळाल्यानंतर महायुती सरकारने शिरसाट यांच्या खांद्यावर मंत्रिमंडळाची जबाबदारी दिल्याने पुढील आठवड्यात शिरसाट यांच्या सिडको अध्यक्ष पदाची नियुक्ती रद्द होणार असल्याची माहिती नगरविकास विभागाच्या विश्वसनीय सूत्रांनी दिली. त्यामुळे लवकरच सिडको अध्यक्ष पदाच्या खांदेपालट होणार हे निश्चित झाले आहे. सिडकोचे नवीन अध्यक्ष कोण, याचीच चर्चा ठाणे व नवी मुंबईतील राजकीय गोटात सुरू आहे. संजय शिरसाट यांना सिडको अध्यक्षपद मिळून तीन महिने उलटले. मात्र हे पद पुन्हा रिक्त होणार आहे. शिरसाट यांना पद मिळण्यापूर्वी अनेक वर्षे यापदावर कोणाचीही नियुक्ती महाविकास आघाडी सरकारने केली नव्हती. माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा कार्यकाळ संपण्यापूर्वी काही दिवसांसाठी शिरसाट यांची अध्यक्षपदावर नियुक्ती करण्यात आली. सिडको महामंडळाला पूर्णवेळ अध्यक्ष न दिल्याने सरकारी अधिकाऱ्यांनीच संचालक मंडळात परस्पर निर्णय घेतल्याचा आरोप केला जात होता. सिडकोच्या संचालक मंडळात सामान्य नागरिकांची बाजू मागील अनेक वर्षे मांडली न गेल्याने लोकप्रतिनिधींमध्ये सुद्धा रोष होता.

# विवेकानंद पब्लिक स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात साजरे

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
□ प्रतिनिधी

**अनगांव :** भिवंडी तालुक्यातील खरीवली येथील विवेकानंद पब्लिक स्कूल मध्ये विद्यार्थ्यांच्या कलागुणांना संधी मिळाली या करिता वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.

या संमेलनाचे उद्घाटन भिवंडी वकील संघटनेचे अध्यक्ष अँड दिनेश्वर पाटील यांनी केले, शिक्षकांनी दिलेला अभ्यास विद्यार्थ्यांनी नियमित आणि प्रामाणिकपणे केल्यास निश्चित यश मिळते, त्यामूळे आपल्याला मिळालेल्या संधीचे सोने करून आपल्या शाळेचे नांव लौकिक करावे असे मत भिवंडी वकील संघटनेचे अध्यक्ष अँड दिनेश्वर पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना केले.

ग्रामीण भागात असलेल्या विवेकानंद पब्लिक स्कूल व ज्यूनिअर कॉलेज या संस्थेच्या वतीने आयोजित केलेल्या या सोहल्यात विद्यार्थ्यांनी शैक्षणिक, सांस्कृतीक, देशभक्ती, दहशतवाद,महिलांवर होणारे अत्याचार, भ्रूणहत्या आतंकवाद, अशा विविध विषयांवर विद्यार्थ्यांनी प्रात्यक्षिके सादर करून उपस्थित पालकांची मने जिंकली, या वेळी संस्थाध्यक्ष शांताराम आगिवले, साप्ताहिक चक्रगतीचे संपादक अँड रोहिदास पाटील, अशोक पाटील, सृष्टी ठाकरे, योगेश परदेशी, सौ वेखंडे, सौ पाटील, उपस्थित होते. यावेळी गूणवंताना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.



# केडीएमसी क्षेत्रात मिळणार ऑनलाईन बांधकाम परवाना

**त्रासमुक्त परवानग्या मिळण्याण्यासाठी ऑनलाईन प्रणालीची प्रभावी अंमलबजावणी**

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण डोंबिवली महापालिका क्षेत्रात बांधकाम व्यावसायिकांना बांधकाम परवानगीसाठी अधिकाऱ्यांच्या कार्यालयात फेऱ्या माराव्या लागणार नाहीत. नवीन वर्षात, कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने इमारत आराखडा मंजुरीची संपूर्ण सुविधा टिडीआर्, रिडेव्हलमेन्ट, परवानगी शुल्क फी, आदी परवानग्या ऑनलाईन माध्यमातून राबिविण्यासाठी मनपा यंत्रणा सज्ज झाली आहे. केडीएमसीच्या मते, बांधकाम आराखड्यांसाठी ही सुविधा आधीच होती, परंतु अनेक तांत्रिक कारणांमुळे लोक बांधकाम परवानगी ऑफलाइन घेत असत. अलीकडेच, बांधकाम परवानगीशी संबंधित कामात पारदर्शकता आणण्यासाठी केडीएमसी आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांनी ही सुविधा पूर्णपणे ऑनलाइन करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर केडीएमसीच्या नगररचना विभागाने गुरुवारी शहरातील बांधकाम व्यावसायिक आणि वास्तुविशारदांची बैठक बोलावली, जिथे त्यांना इमारत आराखड्यासाठी ऑनलाइन अर्ज कसा करायचा आणि त्याबाबत उद्भवणाऱ्या सर्व प्रश्नांचे निराकरण कसे करायचे याचे प्रशिक्षण देण्यात आले. केडीएमसी नगररचना विभागाचे प्रभारी सहाय्यक नगररचना संचालक नगररचनाकार सुरेंद्र टेंगळे यांनी सांगितले की ही सुविधा पूर्णपणे ऑनलाइन करण्यात आली आहे. कोणताही विकासक देशातील कोठूनही ऑनलाइन बांधकाम परवानगीसाठी आराखडा सादर करू शकतो. टेंगळे यांनी सांगितले की, या ऑनलाइन सुविधेअंतर्गत बांधकाम व्यावसायिकाला त्याच्या योजनेशी संबंधित फाइल कोणत्या विभागात आहे हे पाहता येईल आणि जर त्या फाईलमध्ये काही प्रलंबित कागदपत्रे असतील तर ती तो ऑनलाइन पाठवू शकेल. या सर्व कामांसाठी त्याला कार्यालयात जावे लागणार नाही. केडीएमसी इमारत आराखडे ऑनलाइन सादर करण्यासाठी आणि मंजुरीसाठी राज्य सरकारने प्रदान केलेल्या बीपीएमएस सॉफ्टवेअरचा वापर करत आहे आणि ते सुरळीतपणे काम करत आहे. शहरातील बांधकाम व्यावसायिक आणि वास्तुविशारदांनी केडीएमसीच्या या निर्णयाचे स्वागत केले आहे.

याबाबत विकासक विमल ठक्कर म्हणाले, 'आजच्या काळात सर्व काही ऑनलाइन झाले आहे, ज्यामुळे काम सोपे होत आहे. अशा परिस्थितीत, बांधकाम आराखड्याची परवानगी ऑनलाइन असल्याने, आम्हाला आता अधिकाऱ्यांना वारंवार भेटण्यासाठी जावे लागणार नाही आणि आराखडा मंजूर करणे पूर्वीपेक्षा खूप सोपे होईल.' या ऑनलाईन परवानगी प्रक्रिया मुळे जलदगतीने तसेच पारदर्शक, परवानगी प्रक्रिया मार्ग मोकळा झाल्याचे चित्र यानिमित्ताने दिसत आहे.

# डॉ. दिलीप जोशी यांनी गुंफले 'शिक्षणातील विमर्श' या विषयावर स्वामी विवेकानंद व्याख्यानमाला सोहळ्यातील दुसरे पुष्प

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
□ प्रतिनिधी

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातून भारतीय संस्कृती शिक्षणाच्या माध्यमातून प्रत्येकाच्या मनात रुजवणे ,आपल्या संस्कृतीतील सत्य व शाश्वत गोष्टी पटवून देणे हाच शिक्षणातील विमर्श आहे असे प्राचार्य डॉ. श्री. दिलीप गुणवंतराव जोशी यांनी म्हटले.

राष्ट्रीय शिक्षण संस्थेच्या स्वामी विवेकानंद व्याख्यानमाला व पुरस्कार सोहळयातील दुसरे पुष्प प्राचार्य डॉ. श्री. दिलीप गुणवंतराव जोशी यांनी 'शिक्षणातील विमर्श' या विषयावर गुंफले.

यापुढे बोलताना डॉ. दिलीप जोशी म्हणाले की स्वामी विवेकानंदांनी पहिला विमर्श जगाला सांगितला. प्रत्येकाची विचारक्षमता निश्चित करण्यासाठीचे साधन म्हणजे शाळा. भारतीय शिक्षण व्यवस्थेमध्ये म्हणजेच शाळेमध्ये संस्कारक्षम व चारित्र्यवान नागरिक निर्माण करण्याचे सामर्थ्य आहे. हीच गोष्ट या शैक्षणिक धोरणाने हेरली आहे.

'सा विद्या या विमुक्तये' या उक्तप्रमाणे मीपणाची भूमिका सोडून मिळणाऱ्या शिक्षणामुळे आपण मुक्त झालो पाहिजे. शिक्षणामध्ये आधुनिकता आणून प्रत्येकाला कोणतेतरी एखादे तंत्र अवगत व्हावे. मिळालेले शिक्षण हे मुक्त,युक्त ,अर्थ व धर्म मार्गाची माहिती देणारे व याच मार्गावरून पुढे नेणाऱ्या असावे.

मेकॅलो च्या शिक्षण पद्धती मुळे धर्म व मोक्ष या दोनच गोष्टीवर जास्त भर दिला.अर्थ आणि काम यांचा अर्थच समजून न सांगितल्यामुळे मुख्य उद्देश मागेच राहिला. यामध्येच बदल करून चार ही भागांची माहिती व आपल्या पूर्वीच्या परंपरा पुन्हा एकदा शिक्षणामध्ये आणण्याचे कार्य या शैक्षणिक धोरणाच्या माध्यमातून होणार आहे. त्याचबरोबर नैतिक व आध्यात्मिक शिक्षण देखील महत्त्वाचे आहे. याविषयी ज्ञानेश्वर माऊलींनी दिलेली उदाहरणे व दाखले स्पष्ट करून सांगितले.

तसेच शिक्षकांनी विषयाचे परिपूर्ण ज्ञान घ्यावे आणि ते सर्व ज्ञान विद्यार्थ्यांमध्ये संक्रमित करावे.मातृभाषेतील शिक्षण हे अत्यंत महत्त्वाचे असून प्रत्येक शाळेच्या भिंती, वर्ग मातृभाषेतूनच शिक्षण देणारे असावेत.

यावेळी व्यासपीठावर संस्थाध्यक्ष संजय कुलकर्णी ,उपाध्यक्ष विद्याधर शास्त्री,कार्यवाह शिरिष फडके उपस्थित होते. यावेळी संस्थेचे अध्यक्ष संजय कुलकर्णी यांनी आजचे व्याख्याते प्राचार्य डॉ.श्री. दिलीप गुणवंतराव जोशी यांचा सत्कार शाल , श्रीफळ , भेटवस्तू व सन्मानचिन्ह देऊन केला.

यावेळी ईशस्तवन रामनगर प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी तर स्वागत गीत अरुणोदय शाळेमधील विद्यार्थ्यांनी सादर केले. दत्तनगर माध्यमिक शाळेची विद्यार्थीनी कु .श्रेय व्यास हिने कार्यक्रमाच्या शेवटी संपूर्ण वंदे मातरम् म्हटले.

यावेळी वक्त्यांचा परिचय संस्था सदस्य विवेक पुराणिक यांनी करून दिला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन रात्र महाविद्यालयाचे प्राध्यापक श्री.अमित जोशी यांनी केले तर आभार सहकार्यवाह श्री .प्रमोद उंटवाले यांनी मानले.

# नूतन हिंदी प्राथमिक हायस्कूल येथे हस्तकला व विज्ञान प्रदर्शन संपन्न

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण पूर्वेतील राष्ट्रीय सेवा परिषद संस्थेच्या नूतन हिंदी प्राथमिक विद्यालयातील प्राथमिक विभागाचे सुंदर कलाकृती व विज्ञानावर आधारित प्रयोग यांचे प्रदर्शन मोठ्या उत्साहात पार पडले. विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी शिक्षक शाळेत संस्थापक शिवकुमार त्रिपाठी व मुख्याध्यापिका अनुप्रिता पटवर्धन मार्गदर्शनाखाली दरवर्षी विविध शालेय उपक्रमांचे आयोजन करत असतात. विद्यार्थी दरवर्षी कला, व्यावहारिक अनुभव आणि विज्ञान विषयांवर आधारित शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या कलाकृती आणि प्रयोग सादर करतात. या प्रदर्शनाचा मुख्य उद्देश मुलांच्या सर्जनशीलतेला चालना देणे आहे. यावर्षी देखील याच उद्देशाने एक प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. ज्यामध्ये गणेश विद्या मंदिराच्या मुख्याध्यापिका स्मिता मराठे यांना प्रमुख पाहुण्या म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. प्रदर्शन व्यवस्थित पार पडण्यासाठी अन्नू पांडे, मीनल पाटील, वृता पाटील, चंद्रकला सिंग, रशिदा खान, सोनल त्रिपाठी, अंजू पांडे आणि कमलेश मिश्रा ह्या शिक्षकांनी व शाळेतील कर्मचारी रामजी यांनी मेहनत घेतली. तसेच विद्यार्थी व पालक इत्यादींच्या सहकार्यामुळे हा कार्यक्रम यशस्वी झाला.

# १४ वर्षाच्या मुलाची दगडाने ठेचून हत्या

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
□ पेण शहर प्रतिनिधी

पेण येथील कासार तलाव या परिसरामध्ये फणस डोंगरी, पेण येथे राहणाऱ्या १४ वर्षीय मुलाचा मृतदेह दगड़ाने ठेचून मारल्याच्या अवस्थेत सापडून आल्याने पेणमध्ये खळबळ माजली आहे. गणेश बालू चुनारे असे मयत मुलाचे नाव असून तो रात्री आपल्या मित्रांसोबत बाहेर गेला होता मात्र सकाळ पर्यंत घरी आला नाही. अशी माहिती मयत गणेशच्या वडिलांनी पोलिसांना दिली. सकाळी १० वाजन्याच्या सुमारास गणेशचा मृतदेह तलाव परिसरात असणाऱ्या झुडपात आढळून आला. परंतू ही हत्या की आकस्मित मृत्यू याबाबत पोलीस प्रशासन तपास करीत आहेत. बाळु चुनारे यांच्या फर्यादी नुसार पेण पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम २०२३ कलम १०३ (१) प्रमाणे अज्ञात इसामाविरुध्द गुन्हा नोंद केला असून, उपविभागीय पोलीस अधिकारी गजानन टोम्पे यांच्या मार्गदर्शनाखाली व पोलीस निरीक्षक संदीप बागुल यांच्या देखरेखीखाली पेण पोलीस ठाणे अधिक तपास करीत आहेत.

# केडीएमसीकडून थकीत करवसुलीसाठी अभय योजना

❍ दै.ठाणे जीवनदीप वार्ता ❍

**कल्याण :** थकीत मालमत्ता कर व पाणीपटटीवर कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने अभय योजना २०२४-२०२५ जाहिर केली आहे. या योजनेतंर्गत मालमत्ता कर व पाणीपटटीवर दिनांक १५ जानेवारी, २०२५ पर्यंत १००इ शास्ती (दंड/व्याज) व दिनांक १६ जानेवारी २०२५ ते दिनांक ३१ जानेवारी २०२५ पर्यंत ७५इ शास्ती (दंड/व्याज) माफी होणार आहे. 'मालमत्ता कर व पाणीपटटी' भरण्याची अंतिम मुदत जवळ आली आहे. दि.३१ मार्च, २०२५ पर्यंत सर्व शनिवार, रविवार व सार्वजनिक सुटटीच्या दिवशी कार्यालयीन वेळेत सर्व नागरी सुविधा केंद्र सुरु राहणार आहेत. नागरीकांनी आजच आपला मालमत्ता कर आणि पाणीपटटीचा भरणा ऑनलाईन किंवा महानगरपालिकेच्या नागरी सुविधा केंद्रावर करावा.

महापालिका कार्यक्षेत्रातील मालमत्ताधारकांनी दिलेल्या वेळेत कर भरणा करण्यासाठी वेळोवेळी आवाहन करण्यात येत आहे. काही मालमत्ताधारक अद्यापही कराचा भरणा करणेस टाळाटाळ करीत आहेत. याबाबत. थकबाकी असलेल्या नागरीकांना विशेष लक्ष केंद्रीत करुन कायदेशीर अटकावणीची कार्यवाही करण्यात येत आहे.

मालमत्ता कर विभागामार्फत करदात्यांना आवाहन करण्यात येते की, अभय योजनेतून मिळणा-या शास्ती (दंड/व्याज) मधील सवलतीचा लाभ जास्तीत जास्त थकीत मालमत्ता कर व पाणीपटटीधारकांनी घ्यावा व महानगरपालिकेस सहकार्य करावे. असे आवाहन पालिका प्रशासनाने केले आहे.

# सरकारचे नागरिकांना नववर्षाचे गिफ्ट
# वारसनोंद देखील आता ऑनलाईन

❍ दै.ठाणे जीवनदीप वार्ता ❍

**कल्याण :** नवीन वर्षात राज्य सरकारने नागरिकांना आणखी एक गिफ्ट दिले आहे. त्यांना ऑनलाईन वारसा नोंद करता येईल. नागरिकांना ई-फेरफार प्रणालीला पूरक असलेल्या ई-हक्क प्रणालीचा (पब्लिक डाटा एन्ट्री) वापर करून वारस नोंद, सात-बारावरील इकरार नोंदी, मयतांचे नाव कमी करणे, अपाक कमी करणे आदी विविध कामे करता येणार आहे. त्यामुळे नागरिकांना तलाठी कार्यालयात हेलपाटे मारण्याची गरज उरली नाही. असा करता येईल ऑनलाईन अर्ज वारस नोंद, बोजा दाखल करणे, बोजा कमी करणे, इकरार नोंदी, मयताचे नांवे कमी करणे, अपाक कमी करणे, , विश्वस्तांचे नाव कमी करणे वा इतर महसूल कामासाठी नागरिकांना तलाठी कार्यालयात जावे लागते. पण अनेकदा एकाच तलाठ्याकडे दोन-तीन गावाचा पदभार असल्याने त्याची आणि नागरिकांची भेट होत नाही. तलाठी आठवड्यातील वार ठरवून येत असला तरी बैठकी आणि इतर व्यापामुळे त्याचा खाडा पडतो. अशावेळी नागरिकांची कामं खोळंबतात. तर छोट्या-छोट्या कामं सुद्धा पैशांशिवाय होत नसल्याची ओरड होते. यावर आता तंत्रज्ञाना आधारे तोडगा काढण्यात आला आहे. ऑनलाईन वारसा नोंद करता येईल. नागरिकांना ई-फेरफार प्रणालीला पूरक असलेल्या ई-हक्क प्रणालीचा (पब्लिक डाटा एन्ट्री) वापर करून वारस नोंद, सात- बारावरील इकरार नोंदी, मयतांचे नाव कमी करणे, अपाक कमी करणे आदी विविध कामे करता येणार आहे. नागरिकांना तलाठी कार्यालयात न जाता महसूल संदर्भातील कामे घरबसल्या ऑनलाईन पद्धतीने करता येतील.

# दुचाकी चोरणाऱ्या दुकलीला अटक

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
□ कुणाल म्हात्रे

**कल्याण :** मोटारसायकल चोरी करणाऱ्या दोन सराईत गुन्हेगारांना मानपाडा पोलीसांनी उल्हासनगर येथुन अटक केली असून त्यांच्याकडून ४ गुन्हे उघडकीस आणले आहेत. मानपाडा पोलीस स्टेशनच्या हददीत मोटारसायकल चोरीचे गुन्हे घडत असल्याने हे गुन्हे उघडकीस आणण्यसाठी अप्पर पोलीस आयुक्त संजय जाधव, पोलीस उपायुक्त अतुल झेंडे, सहाय्यक पोलीस आयुक्त सुहास हेमाडे यांनी विशेष मोहिम राबविण्याबाबत मार्गदर्शन करुन सुचना दिलेल्या होत्या.

वरिष्ठांचे आदेशानुसार नपाडा पोलीस स्टेशनचे व.पो.निरी. विजय कादबाने यांनी वाढत्या वाहन चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्यासाठी पथके कामाला लावली. सर्व अधिकारी व अंमलदार यांनी सीसीटिव्ही फुटेज, तांत्रिक तपास करीत असतांना आरोपींबाबत सपोनि संपत फडोळ यांना बातमीदाराकडुन खात्रीशिर बातमी प्राप्त झाली. मिळालेल्या गोपनिय बातमीदाराच्या आधारे सपोनि संपत फडोळ व गुन्हे प्रकटीकरण पथक असे उल्हासनगर येथे रवाना होवून अहोरात्र मेहनत घेवून सराईत आरोपी रितिक बाविस्कर वय १९ वर्षे आणि कुणाल नायडु वय १९ वर्षे यांना उल्हासनगर येथुन ताब्यात घेवून त्यांना अटक करून त्यांच्याकडुन मानपाडा पोलीस ठाणे, कोळसेवाडी पोलीस ठाणे व एनआरआय पोलीस ठाणे, नवी मुंबई येथील एकुण ४ मोटारसायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आणलेले आहेत. आरोपींकडुन चोरी झालेल्या चार मोटारसायकल असा एकुण रक्कम २ लाख ७० हजार रू. किंमतीचा मुददेमाल हस्तगत करण्यात आलेला आहे. अटक आरोपी हे सराईत गुन्हेगार असुन यापुर्वी ठाणे आयुक्तलयात आरोपीत कुणाल नायडु यास एकुण २ गुन्हयात अटक करण्यात आली आहे. या कारवाईत मानपाडा पोलीस स्टेशन, कोळसेवाडी आणि एनआरआय पोलीस स्टेशन येथील ४ गुन्हे उघडकीस आले आहेत.

# जिल्ह्यातील विविध वकील संघटनांकडून कल्याण येथे 'संविधान अमृत महोत्सव' साजरा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
□ प्रतिनिधी



**या कार्यक्रमास उपस्थित असणाऱ्या सर्व मान्यवर मातृसंस्थेचे सन्माननीय उपाध्यक्ष ॲड. सुदीप पासबोला साहेब , मातृ संस्थेचे माजी अध्यक्ष सन्मा.ॲड. जायभावे साहेब,सन्मा.ॲड.गणेश शिरसाट साहेब, सन्मा.माजी अध्यक्ष ॲड. गजानन चव्हाण साहेब तसेच दिवाणी वकील संघटना कल्याण जिल्हा न्यायालय वकील संघटना उल्हासनगर वकील संघटना शहापूर वकील संघटना आणि मुरबाड वकील संघटनेच्या सर्व पदाधिकारी,वकील बंधू भगिनींचे मनःपूर्वक आभार**
**- ॲड. प्रकाश जगताप,**
**अध्यक्ष कल्याण जिल्हा न्यायालय वकील संघटना**

कल्याण : बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोवा, आदरणीय गजानन चव्हाण यांच्या प्रयत्नातून कल्याण येथे दिवाणी वकील संघटना, कल्याण जिल्हा न्यायालय वकील संघटना कल्याण, उल्हासनगर वकील संघटना, मुरबाड वकील संघटना आणि शहापूर वकील संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने काल दिनांक ११.१.२०२५ रोजी के. सी. गांधी हायस्कूलच्या एसी हॉलमध्ये संविधान अमृत महोत्सव अतिशय सुंदर साजरा करण्यात आला. सर्वप्रथम संविधानाचा सरनामा आणि संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला गुलाब पुष्प अर्पण करून दीप प्रज्वलन करण्यात आले.

काल संपन्न झालेल्या या समारंभात मातृसंस्था वकील परिषदेचे उपाध्यक्ष सुदीप पासबोला यांनी प्रास्ताविक सादर करुन मातृसंस्था वकील परिषदेचे माजी अध्यक्ष जयंत जायभावे यांनी संविधानाच्या सर्वनामाचे वाचन केले. त्यांच्या मागे उपस्थित सर्वांनी संविधानाचे सरनामाचे एकत्रितरित्या वाचन केले. जायभाये यांनी संविधान निर्मिती बाबत विविध दाखल्यांचा आधार घेत संविधान कसे निर्माण झाले याबाब ओजस्वी भाषेत विवेचन केले.

कार्यक्रमाचे दुसरे महत्त्वाचे वक्ते गणेश शिरसाट यांनी संविधानाबद्दल, आणि संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या बद्दल माहिती मार्गदर्शन देऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे घटना निर्मितीमध्ये महत्त्वाचे योगदान असल्याचे सांगून ऐतिहासिक असे केशवानंद भारती विरुद्ध केरळ सरकार या केसचा रोमहर्षक उलगडा केला. केशवानंद भारती विरुद्ध केरळ सरकार हा खटला सर्वोच्च न्यायालयाच्या संविधान पिठासमोर संविधानाच्या १३ न्यायाधीशांसमोर कसा चालला ? तसेच या खटल्यातील दोन्ही पक्षांच्या वकिलांचा युक्तिवाद कसा कसा होत गेला ? दोन्ही पक्षांच्या वकिलांच्या एकमेकांवर कुरघोडी करण्याचे प्रयत्न तसेच घटना पिठातील तेरा न्यायाधीशांमधील काही न्यायाधीशांचा एकमेकांवर कुरघोडीचा प्रयत्न कसा झाला याचा उलगडा आपल्या दीड तासाच्या मार्गदर्शनपर विवेचनात अतिशय सुंदर पद्धतीने गुंफला.

ॲड़. गणेश शिरसाट यांचे व्याख्यान म्हणजे केशवानंद भारती विरुद्ध केरळ सरकारचा खटला ऐकणारे जणू प्रत्यक्ष अनुभवत होते. डोळ्यासमोर प्रसंग चित्रे उभे राहत होते. वरिष्ठ ॲड़. नानी पालखीवाला यांच्या जुनिअर वकिलांचा सहभाग ही किती महत्वपूर्ण होता हेही सांगितलं. ज्युनिअर वकील केसमधील उतारे दाखले हॉटेलमध्येच विसरले याचे जाणीव होताच ज्युनिअर वकिलांनी प्रसंगावधान राखत कशा पद्धतीने ते दाखले उतारे हॉटेल मधून सर्वोच्च न्यायालयात आणले हा प्रसंग तर अंगावर काटे आणणार होता.

एकंदरीत ॲड़ गणेश शिरसाठ यांच्या व्याख्यानाचे सार म्हणजे की संसद मोठी कीसर्वोच्च न्यायालय मोठे की भारतीय संविधान मोठे ? यात भारतीय संविधान सर्वात मोठे असल्याचे त्यांनी केशवानंद भारती विरुद्ध केरळ सरकार या खटल्याच्या माध्यमातून सिद्ध केले आहे. हे सांगत असतानाच राजकारणी लोक म्हणजेच संसदेतील खासदार मंत्री प्रधानमंत्री आपल्या स्वार्थासाठी संविधानाच्या स्ट्रक्चर मध्ये कधीही बदल करू शकणार नाहीत. तसे त्यांना करताही येणार नाही ! असे मत गणेश शिरसाट यांनी यावेळी मांडले

# ठाण्यात अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
□ ठाणे, दिलीप पवार

श्री संत भगवान बाबा व श्री संत वामनभाऊ महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त गेली ३६ वर्षापासूनची परंपरा सांभाळत श्री संत वामनभाऊ महाराज सेवा मंडळ ठाणे यांचे वतीने आईमाता मंदिर, वर्तकनगर, ठाणे येथे दि.१४ जानेवारी ते २२ जानेवारी २०२५ या कालावधी मध्ये अखंड हरिनाम सप्ताह, ग्रंथराज पारायण सोहळा व किर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, आ. जितेंद्र आव्हाड उपस्थित राहणार आहेत. साप्ताहिक दैनंदिन कार्यक्रमामध्ये पहाटे ४ ते ६ वा. काकड आरती, सकाळी ६ ते ७ वा विष्णुसहस्त्रनाम, सकाळी ६ ते १० वा ज्ञानेश्वरी पारायण, १० ते १२ वाजता गाथा भजन, दुपारी २ ते ४ वाजता महिला भजन, ४ ते ५ प्रवचन, ५ ते ७ वा हरिपाठ व सायंकाळी ८ ते १० वाजता जाहिर हरि किर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. दि.२२ जानेवारी २०२५ रोजी सकाळी १० ते १२ वा. ह.भ.प. डॉ. विष्णुपंत गर्जे महाराज यांचे काल्याचे किर्तन व परिसरात दिंडी मिरवणूक होईल. त्यानंतर सिद्धीविनायक हॉस्पिटलचे संचालक डॉ.अमोल गिते यांचे मार्फत महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे. भाविकांनी लाभ घेऊन कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आवाहन कार्यक्रमाचे कमिटी अध्यक्ष शशिकांत दौंड, उपाध्यक्ष बाबासाहेब वाघ, शिवाजीराव जायभाये यांनी केले आहे.

# सफाळे एस. टी आगारात 'सुरक्षितता अभियान'

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**सफाळे -** दरवर्षीप्रमाणे नवीन वर्षाच्या सुरुवातीला एसटी महामंडळ सुरक्षित प्रवासाच्या दृष्टीने एसटी कर्मचाऱ्यांमध्ये जाणीव जागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने 'सुरक्षितता अभियान' राबविते. सदर अभियान एसटीच्या मध्यवर्ती कार्यालयापासून सर्व आगार पातळीवर एकाच वेळी ११ ते २५ जानेवारी दरम्यान राबविण्यात येणार आहे.

या अनुषंगाने दिनांक ११ जानेवारी २०२५ रोजी पालघर जिल्ह्यातील सफाळे आगरात ' राष्ट्रीय रस्ता सुरक्षा महिना जानेवारी २०२५' सुरक्षा अभियान कार्यक्रमा अंतर्गत मान्यवर व प्रमुख पाहुणे- सफाळे पोलीस ठाणे प्रभारी पोलीस अधिकारी दत्ता शेळके सपोनि. यांच्या हस्ते कार्यक्रमाचे अध्यक्ष सतीश मालचे सफाळे एस टी डेपो मॅनेजर यांच्या उपस्थितीत कार्यक्रम उद्घाटन करण्यात आले. यावेळी दत्ता शेळके यांनी गाडी चालक- वाहक यांना मार्गदर्शन करताना सांगितले, गाडी चालकाने गाडी चालवताना. मन शांत ठेवून एकाग्रतेने, मनातील अविचार, हेवेदावे विसरून चालवावी. दररोज शेकडो लोकांचे जीवन त्यांच्या हातात असते. मादक / आमली पदार्थ सेवन करून गाडी चालवू नये. जर एखाद्या वेळस अपघात घडला तर पळून न जाता जवळील पोलीस ठाणे किंवा पोलीस हेल्पलाईनला संपर्क साधावा. जेणेकरून पुढील अनार्थ टळू शकतो.

सतीश मालचे यांनी राष्ट्रीय रस्ता सुरक्षा अभियान जानेवारीत का साजर करतात. याबद्दल सविस्तर माहिती दिली. तसेच एसटी ला २५ वर्षे सेवा देणारे व मधुकर राऊत. व १५ वर्षे सुरक्षित सेवा बिल्ले प्राप्तदेणारा सुनील किणी, व श्री गणेश किणी यांचा मान्यवर दत्ता शेळके साहेब यांच्या हस्ते गुलाब पुष्प देऊन सन्मानित करण्यात आले. तसेत मान्यवर व त्याच्या सोबत आलेले पोलीस कर्मचारी यांचे, डेपो मॅनेजर यांच्या हस्ते गुलाब पुष्प देऊन गौरवण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रस्तावित सनी जोशी यांनी केले.


# शेलारी येथे धर्म महोत्सवाची सांगता

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : मुरबाड तालुक्यातील एक अवलिया संत पुरुष वै.श्रीराम गजानन जोशी यांच्या पुण्यतिथी निमित्त शेलारी येथे भव्य धर्म महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते या धर्म महोत्सवात महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध प्रबोधनकारहरिभक्त परायण वाणी भूषण राजाराम महाराज घावत यांची प्रवचने तर आचार्य महामंडलेश्वर, धर्मगुरू, महंत अमृताश्रम स्वामी महाराज जोशी, विक्रांत महाराज पोंडेकर, उत्तम महाराज गाडे मुक्ताई ज्ञानपीठ पुणतांबा गोसेवक ज्ञानेश्वर माऊली कदम छोटे माऊली यांची कीर्तने आयोजित करण्यात आली होती यां महोत्सवाचे उद्‌घाटन आचार्य डॉ. रामकृष्णदास महाराज यांच्या शुभहस्ते झाले याप्रसंगी श्री स्वामी धनंजय महाराज तुंगेश्वर ,योगी गोपीनाथ महाराज संगमेश्वर,योगी यशनाथ महाराज योगी अर्जुन नाथ महाराज टाकेश्वर यांची प्रमुख उपस्थिती होती मुरबाड तालुक्यातील नामवंत मृदंगाचार्य सुधीर कराले, नितीन चौधरी तर गायनाचार्य पवन शिंदे ,त्र्यंबक देवकर, गोविंद पवार उल्हास पागर यांच्यासोबत वारकरी संप्रदायातील अनेक महनीऊ मान्यवर यांचे मार्गदर्शन या सोहळ्यात झाले.

काल्याच्या कीर्तनाने या महोत्सवाची सांगता झाली.ग्रामस्थ शेलारी,दहिगाव व परिसर यांनी या धर्म महोत्सवाचे आयोजन केले होते

# भूमाफियांकडून बेसुमार जंगलतोड
# वसई, पालघरचे वनक्षेत्र ३५ टक्क्यांनी घटले



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

वसई : नैसर्गिक वनसंपदा असलेल्या पालघर जिल्ह्यातील वनक्षेत्र तब्बल ८७ चौरस किलोमीटर घटले आहे. 'इंडिया स्टेट ऑफ फॉरेस्ट रिपोर्ट' (आयएसएफआर) अहवालातून ही धक्कादायक माहिती समोर आली आहे. भूमाफियांकडून होणारे भराव, बांधकामे आणि झांडाची कत्तल होत असल्याने हिरवा पट्टा नष्ट होऊ लागला असल्याचे या अहवालात नमूद करण्यात आले आहे. विशेष म्हणजे राज्यातील २४ जिल्ह्यातील १ हजार ७७८ वनक्षेत्र घटले असून त्यात सर्वाधिक घट ही पालघर जिल्ह्यातील आहे.

पालघरच्या पश्चिमेला सागरी किनारा, पूर्वेकडे डोंगर असल्याने हा जिल्हा निसर्गरम्य आणि पर्यटनासाठी ओळखला जातो. पालघर जिल्ह्यातील नैसर्गिक जंगलामुळे पर्यावरणाचा समतोल राखला जात असतो. मात्र गेल्या काही वर्षांपासून भूमाफियांनी मोठ्या प्रमाणावर जंगलतोड करून अनधिकृत बांधकामे करण्यास सुरवात केली आहे. वनखात्याच्या जमिनीवर अतिक्रमण करून अनधिकृत बांधकामे होत आहे. यामुळे जिल्ह्यातील हिरवा पट्टा नष्ट होऊ लागला आहे. 'इंडिया स्टेट ऑफ फॉरेस्ट रिपोर्ट' (आयएसएफआर) या संस्थेने राज्यातील वनक्षेत्राच्या सद्यस्थितीचा अहवाल प्रसिध्द केला आहे. या अहवालातून हे भीषण वास्तव समोर आले आहे. पालघर जिल्ह्यात वन क्षेत्राचा मोठ्या प्रमाणात विस्तार आहे. पर्यावरणाच्या अनुषंगाने जंगलाचे व पशुपक्ष्यांचे संवर्धन व्हावे, म्हणून वन विभागामार्फत एकूण २४८.३८ चौरस किलोमीटर राखीव क्षेत्राची घोषणा वनविभागाने केली होती. त्यानुसार जव्हार (११८.२८) डहाणू ( ४९. १५) आणि धामणी येथे धामणीमध्ये (८०.९५) चौरस किलोमीटर राखीव वनक्षेत्रे आहेत. याशिवाय पालघर, वसई, तलासरी, डहाणू, जव्हार, मोखाडा, विक्रमगड, वाडा तालुक्यात वनहक्क पट्ट्यांचे क्षेत्र २८ हजार ९०० हेक्टर इतके आहे. मात्र भू माफियांनी अनधिकृत बांधकाम करण्यासाठी मोठ्या प्रमाणवर जंगलतोड करून वनक्षेत्रावर कब्जा केला आहे. त्यामुळे ८७ चौ.कि.मी. म्हणजेच एकूण वनक्षेत्राच्या ३५ टक्के वनक्षेत्र घटले आहे.

# गाण्याच्या माध्यमातून वाहतूक नियमांची जनजागृती

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
□ बाळासाहेब भालेराव

मुरबाड दि.१२- राष्ट्रीय रस्ता सुरक्षा अभियान २०२५ महामार्ग पोलीस ठाणे परिक्षेत्र अंतर्गत पोलीस मदत केंद्र माळशेज येथील पोलीस हवालदार संजय घुडे यांच्या संकल्पनेतून त्यांनी गायलेले व संगीतबद्ध केलेले व महेशकुमार धानके यांनी लिहिलेले " जीवन अनमोल है भय्या " हे गीत वाहतूक नियम,जीवन सुरक्षित हे गीत संपूर्ण भारतात सर्व ठिकाणी लोकांपर्यंत पोहोचत आहे.

दिवसेंदिवस वाहनांचे प्रमाण वाढत आहे, सोबत अपघाताच्या प्रमाणात देखील वाढ होत आहे. वाहतुकीच्या नियमांचे पालन केले तर अपघाताचे प्रमाण कमी होण्यास मदत होऊन मृत्यूचे व जखमीचे प्रमाण देखील कमी होईल. बाईक स्वरांनी हेल्मेटचा वापर करावा. चार चाकी वाहनाने सीडबड लावावा. ड्रिंक करून ड्रायव्हिंग करू नये. गाडी चालवताना मोबाईलचा वापर करू नये.

हॉर्नचा वापर कमी करावा. योग्य वेळी सिग्नलचा वापर करावा. तसेच महत्त्वाचे ठिकाणी पोलीस वाहतुकी संदर्भात माहिती देत असतील तर ते समजून घ्यावे. तसेच वाहतुकीचे नियमांचे पालन करावे याबाबत सविस्तर असे महामार्ग पोलीस केंद्र माळशेज येथील पोलिसांना संजय घुडे यांनी जीवन अनमोल है भैया या हिंदी गीताच्या माध्यमातून वाहतुकीचे नियम समजून सांगण्याचा प्रयत्न केला आहे. संपूर्ण भारतात या गीतासाठी जनतेकडून प्रतिसाद मिळत असून जनता तसेच प्रिंट मीडियाच्या माध्यमातून हे गीत लोकांपर्यंत पोहोचवत आहे. पोलीस मदत केंद्र माळशेज येथील प्रभारी अधिकारी अनिल विसपुते व सर्व टीमवर्क या या गाण्यात सहभागी झाले असून.

जय मनोरे यांनी व्हिडिओग्राफी केली असून. रुपेश गोंधळी व दर्शन वाकचौडे यांनी ध्वनिमुद्रण व संगीत सहाय्यक केल आहे.

# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेमध्ये जिजाऊ मॉ साहेब आणि स्वामी विवेकानंद जयंती साजरी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी :** राजमाता जिजाऊ मॉ साहेब आणि स्वामी विवेकानंद जयंती निमित्त महानगरपालिका मुख्यालयात तळ मजल्यावर मा. अतिरीक्त शहर अभियंता श्री. सचिन नाईक यांचे हस्ते जिजाऊ मॉ साहेब आणि स्वामी विवेकानंद यांचे प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन त्यांना अभिवादन करण्यात आले.या प्रसंगी मा. सहायक आयुक्त श्री. मिलींद पळसुले



(समाजकल्याण), श्री. फैसल तातली (आरोग्य), नियंत्रण अधिकारी पर्यावरण विभाग श्री. सुदाम जाधव, श्री. राजेश पवार मुख्य अग्निशमन अधिकारी, श्री. जे. एम. सोनावणे (आरोग्य विभाग प्रमुख), श्री. हरीष भंडारी (आरोग्य विभाग प्रमुख), श्री. संतोष टावरे माहिती व जनसंपर्क अधिकारी श्री. श्रिकांत परदेशी आणि महानगरपालिकेचे कर्मचारी उपस्थीत होते

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री. रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले. (या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८ E Mail – jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी